राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -१२३२/२०२४/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| तक्रारदार | उत्तरवादी |
|---|---|
| श्री.शिवाजी गोविंद बनसोडे | जन माहिती अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त, कामगार उप आयुक्त कार्यालय,पुणे |

(निर्णय दिनांक- ०९/०४/२०२५)

तक्रारदार यांनी दिनांक /२५०९ २०२४/रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारदार यांनी आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही अशा आशयाची तक्रार केली आहे .

माहितीशी संबंधित द्वितीय अपील क्रमांक २१७/२०२३/पुणे यामध्ये आयोगाने दिनांक २०/०५/२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणानी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून असे स्पष्ट होते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर प्रकरणात सहायक कामगार आयुक्त पुणे यांनी वर नमूद द्वितीय अपीलामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात कार्यवाही करावी व तसे तक्रारदार यांना कळवावे आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

वरील निर्देशानुसार तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

9.4.25

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्र.-१२३२/२०२४/पुणे 7700/2025 दिनांक 23/4/2025

रामाआ-पुणे/२०२५/RCG